**MHBI080001022019**

-

## कि.दि.अ.क्र. ३८/२०१९ मधील निशाणी क्र. २५ खालील आदेश

अर्जदारांनी सदरचा अर्ज मयत मूळ अर्जदार क्र.१ सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार याच्या विरुध्द मुळ अर्ज अवसान (अबेट) झालेबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, मुळ अर्जदार क्र.१ सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार हा ता. ०४.०८.२०२० रोजी महामारी मध्ये अंबाजोगाई येथे मयत झाला असून त्याचे मयत प्रमाणपत्र उपलब्ध होत नव्हते म्हणून त्याचे वारस सदरच्या प्रकरणात अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. मूळ अर्जदार क्र.१ चे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द अवसान झाला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास सामनेवालाने जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे. म्हणुन त्यांनी सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | ... | होय. |

२. आदेश काय ? .. अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

४. मी अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. तौर व सामनेवालातर्फे विद्वान वकील श्री. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. अर्जदारांनी सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार याचे मृत्यूचे प्रमाणपत्र नि.क्र.२४/१ वर दाखल केले आहे. मुळ अर्जदार सत्यप्रकाश वासुदेव रुद्रवार हा ता. ०४.०८.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. सदरचे अर्जदारांनी तो मयत झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत त्याचे वारस अभिलेखावर न घेतल्यामुळे त्याच्याविरुध्द अर्ज अवसान झाला आहे. परंतु दोन्ही पक्षकारामधील वादाचे कायमचे निराकरण करण्यासाठी व न्यायाचे हितार्थ मयत मुळ अर्जदाराचे विरुध्द अर्ज अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

### मुद्दा क्र. २ बाबत

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र. २५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

GHANWAT SOPAN DASHRATH
Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2024.06.18 15:21:18 +0530

दिनांक : १८/०६/२०२४ (सो. द. घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

माजलगाव.

<u>कि.दि.अर्ज.क्र. ३८/२०१९</u>
<u>निशाणी क्र.२५ खालील आदेश</u>

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | ए.एम.दशरथ |
| कोर्टाचे नाव | – | दि.न्या.व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८/०६/२०२४ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – १८/०६/२०२४

(ए.एम्.दशरथ)
लघुलेखक ग्रेड – १,
जिल्हा न्यायालय, माजलगाव